Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २७ ]गुरूवार ते बुधवार, नोव्हेंबर १९-२५, २०२०/कार्तिक २८-अग्रहायण ४, शके १९४२[पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३२.

### मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांजकडून

**सेवाग्राम विकास योजनेच्या क्षेत्रातील मौजा-सेवाग्राम, ग्रामपंचायत सेवाग्राम, ता. जि. वर्धा येथील श्री. संदीप बापुरावजी देवतळे, रा. सेवाग्राम, ता. जि. वर्धा यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ३८ एकूण आराजी १.२७ हे. आर कृषि क्षेत्रामध्ये समाविष्ट जमिनीचे (कृषी झोन) मधून काढून रहिवासी झोनमध्ये बदल करणेबाबत.**

क्रमांक जिपव-ग्रापं-अनुदान-वशि-१८८२-८३-२०२०.—

ग्रामपंचायत सेवाग्राम मधील जिल्हा परिषद, वर्धा कक्षेतील शेत सर्वे क्र. ३८ मध्ये विषयांकित बदल करण्याकरीताचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचा असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ जून १९९० चे क्र. वियो-सेवाग्राम-(बिनप)-टिपीव्ही-६-७६९१-नुसार वर्धा जिल्हा परिषद ने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांची अधिसूचना क्रमांक डिपी-सेवाग्राम-अडमिन-२, दिनांक १८ मे, १९७७ द्वारे सेवाग्राम, नांदोरा, कामठवाडा, वरुड आणि बरबडी ह्या ५ ग्रामपंचायतीच्या सुपूर्ण क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार वापरण्याची परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग, निर्णय क्रमांक टीपीव्ही १०८६-३७९१-सीआर-१०३-१-८७ नवि-१७, दिनांक ५ जानेवारी १९८७ अन्वये 'ब' व 'क' वर्ग नगर परिषद तसेच बिगर नगर परिषद शहरांच्या विकास योजनांना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार अंतिम मंजुरी देण्याबाबतचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे द्वारे दिनांक ३१ मार्च, १९९० या दिनांकापासून विकास योजना अंमलात आली. करीता सेवाग्राम विकास योजनेनुसार मौजे सेवाग्राम गावाचा विकास करण्याचे दृष्टीने वरील मंजूर विकास योजनेमध्ये खालीलप्रमाणे किरकोळ फेरबदल करणे आवश्यक आहे.

मंजूर विकास योजनेतील मंजूर अभिन्यास मौजा-सेवाग्राम, ग्रामपंचायत सेवाग्राम, ता.जि. वर्धा येथील श्री. संदीप बापुरावजी देवतळे, रा. सेवाग्राम, ता. जि. वर्धा यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ३८ एकूण आराजी १.२७ हे. आर आहे. त्यांनी सदरचे क्षेत्राचा वापर निवासी प्रयोजनाकरीता करण्याचे ठरविले आहे. त्याकरीता त्यांनी जिल्हा परिषदेकडे दिनांक १७ डिसेंबर, २०१९ ला कागदपत्रांचे पूर्ततेसह प्रस्ताव सादर करून क्षेत्र बदल करण्याची विनंती केलेली आहे. सोबत १. ग्रामपंचायत सेवाग्राम यांचे ठराव क्रमांक ७/१, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ चे सभेचे ठराव अन्वये सदरचे क्षेत्र बदल करण्यास मंजुरी दिलेली आहे. २. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्र. DHO-UIP-Site Insp./93-1826-19, date 28-11-2019. अन्वये शेत सर्वे क्र. ३८ एकूण आराजी १.२७ हे. आर, हे रहीवासी करण्यास मंजुरी दिलेली आहे. तसेच, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा विषय क्र. २१ (१०), दिनांक २४ ऑगस्ट, २०२० अन्वये उक्त कृषी क्षेत्रात समाविष्ट जमिनीचे रहीवासी क्षेत्रात बदल करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्तावाबाबत सूचित करण्यात येते की, ज्या कुणाला वरील फेरबदलाबाबत काही आक्षेप अथवा सूचना पाठवावयाच्या असतील त्यांची ही सूचना वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येईल. सदहू किरकोळ फेरबदल दर्शविणारा सेवाग्राम विकास योजनेचा नकाशा कार्यालयीन वेळात सर्व दिवशी अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

**डॉ. सचिन ओम्बासे,** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक ९ नोव्हेंबर २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.